पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक १४

**सभावृत्तांत**

दिनांक - २३/१२/२०१३ वेळ – दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा सोमवार दिनांक २३/१२/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. काळभोर वैशाली जालिंदर
३) मा. जाधव साधना रामदास
४) मा. शितोळे शैलजा बाबुराव

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, डॉ.गुजर – वैद्यकीय अधिकारी, मा.पाटील – प्रशासन अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.९ : मा.प्रभाकर नामदेव वाघेरे – नगरसेवक यांचा सभेस अनुपस्थित राहण्यास परवानगी मिळणेबाबतचा विनंती अर्ज – मा.वैशाली काळभोर, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०: मा.प्रशांत शितोळे - नगरसेवक यांचा सभेस अनुपस्थित राहण्यास परवानगी मिळणेबाबतचा विनंती अर्ज – मा.वैशाली जवळकर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११: मा.निलेश बारणे - नगरसेवक यांचा सभेस अनुपस्थित राहण्यास परवानगी मिळणेबाबतचा विनंती अर्ज – मा.वैशाली जवळकर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२: मनपाच्या ड प्रभागातील उद्यानांच्या किरकोळ दुरुस्ती व लहान मोठी विकास कामे करणेबाबत - मा.साधना जाधव, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३: पिंपळे गुरव येथील हॉटेल सृष्टी समोरील जागेत उद्यान विकसित करणेबाबत – मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१४: प्र.क्र.५३ मधील शाळा इमारतीची स्थापत्य विषयक दुरुस्ती करणे या कामामधून म्हातोबा मंदिरामधील उद्यानालगतची रिटेनिंग वॉल बांधणेबाबत – मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.साधना जाधव    अनुमोदक – मा. शैलजा शितोळे

मा.आमदार आण्णा बनसोडे यांच्या मातोश्री सोजाबाई दादू बनसोडे यांचे दु:खद निधन झालेले असलेने त्यांना श्रध्दांजली वाहून सोमवार दिनांक ०३/०१/२०१४ सकाळी ११.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-------------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

----------

**सभापती -** सोमवार दिनांक ०३/०१/२०१४ सकाळी ११.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक १४

**सभावृत्तांत**

( दिनांक २३/१२/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - ०३/०१/२०१४ वेळ – सकाळी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक २३/१२/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०३/०१/२०१४ रोजी सकाळी ११.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल - सभापती
२) मा. प्रशांत शितोळे
३) मा. शितोळे शैलजा बाबुराव
४) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.टेकाळे, मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.लडकत – कार्यकारी अभियंता, डॉ.मनोज देशमुख – वैद्यकीय अधिक्षक, मा.पाटील – प्रशासन अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक १५/११/२०१३, ०६/१२/२०१३ व ०९/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र.१२ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०६/१२/२०१३ व ०९/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र.१३ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १७४ विषय क्रमांक : १
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा. शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. सतिश कुलकर्णी, मुख्य अधिकारी गट अ यांचे सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत ....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १७५ विषय क्रमांक : २
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. ज्ञानेश्वर ढेरे, मुख्याधिकारी श्रेणी-१ यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : १७६ विषय क्रमांक : ३
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३, दि.०३/०८/२०१३

विषय - श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत ...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : १७७ विषय क्रमांक : ४
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३, दि.२१/०६/२०१३

विषय - श्री. प्रमोद भीमराव भोसले, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा (वरिष्ठ) गट-अ यांचे मुख्यलेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत..

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १७८ विषय क्रमांक : ५
दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५०/२०१३, दि.१३/०९/२०१३

विषय - जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.....

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १७९ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५७/२०१३, दि.१७/०९/२०१३

विषय - श्री. प्रशांत शरद खांडकेकर, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत ....

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८० विषय क्रमांक : ७

दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८१ विषय क्रमांक : ८

दिनांक : ०३/०१/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १८२ विषय क्रमांक : ९

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

श्री.प्रभाकर नामदेव वाघेरे – नगरसेवक यांनी ते आजारी असल्याने दिनांक १८/१२/२०१३ च्या मा.क्रीडा समिती सभेस तसेच दिनांक २०/१२/२०१३ च्या मा.महापालिका सभेस उपस्थित राहू शकणार नसल्यामुळे सभेस अनुपस्थित राहण्याच्या विनंती अर्जास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८३ विषय क्रमांक : १०

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.वैशाली जवळकर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

श्री.प्रशांत शितोळे यांच्या दिनांक २०/१२/२०१३ च्या मा.महापालिका सभेस वैयक्तीक कारणास्तव अनुपस्थित राहणेच्या विनंती अर्जास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८४ विषय क्रमांक : ११

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.साधना जाधव, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

श्री.निलेश बारणे यांच्या दिनांक २०/१२/२०१३ च्या मा.महापालिका सभेस वैयक्तीक कारणास्तव अनुपस्थित राहणेच्या विनंती अर्जास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८५ विषय क्रमांक : १२

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

मनपाच्या ड प्रभागातील उद्यानांची किरकोळ दुरुस्ती विषयक व लहान मोठी विकासाची कामे करणे या कामासाठी मनपाच्या सन २०१३-१४ च्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४५४, अनु.क्र.३० वर स्थापत्य उद्याने या लेखा शिर्षकाअंतर्गत र.रु.१५,००,०००/- तरतूद आहे. पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३५२ राजमाता जिजाऊ उद्यानासाठी बुरुज व तटबंदीचा समावेश असलेले मुख्य प्रवेशद्वार बांधणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,००,००,०००/- अपेक्षित आहे. या कामासाठी आवश्यक र.रु.१,००,००,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) च्या रक्कमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८६ विषय क्रमांक : १३

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

पिंपळे गुरव येथील हॉटेल सृष्टी समोरील जागेत उद्यान विकसीत करणे या कामासाठी मनपाच्या सन २०१३-१४ च्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४६५, अनु.क्र.११४ वर स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षका अंतर्गत र.रु.४५,००,०००/- तरतूद आहे. या कामासाठी स्थापत्य

विभागामार्फत र.रु.१,८०,००,०००/- ची निविदा काढणेत आली आहे. तथापि ३ एकर जागेवर संपूर्ण उद्यानाचे आरक्षण विकसीत करणेसाठी अंदाजे र.रु.५,००,००,०००/- चा खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु.५,००,००,०००/- मधून र.रु.१,८०,००,०००/- वजा जाता उर्वरित र.रु.३,२०,००,०००/-(अक्षरी र.रु.तीन कोटी वीस लाख फक्त) च्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८७ विषय क्रमांक : १४

दिनांक : ०३/०१/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

प्र.क्र.५३ वाकड मधील शाळा इमारतीची स्थापत्य विषयक दुरुस्ती करणे या कामाची निविदा स्थापत्य विभागामार्फत काढणेत आलेली आहे. या कामामधून याच प्रभागातील म्हातोबा मंदीरामागील उद्यानालगतची रिटेनिंग वॉल बांधून देणेस व स्थापत्य विभागामार्फत रिटेनिंग वॉलचे काम पूर्ण करणेबाबतची कार्यवाही तातडीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ०९ /२०१४
दिनांक - ०४ / ०१ / २०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.